नि.फौ.ख. क्रमांक २३३/२०२०
सरकार विरुध्द पांडुरंग व अन्य
निशाणी क्रमांक –**७१.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – मुशरफ रौफसाब शेख,
वय -४१ वर्षे, धंदा -पोलीस हेड कॉन्स्टेबल,
रा. पोलीस ठाणे, वाढवणा, ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन.ए. भांगे</u>**
(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ अन्वये )

**०१.** मी आरोपींना ओळखत नाही. दिनांक १४/१०/२०२० रोजी मी किनगाव पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. दिनांक ०५/१०/२०२० रोजी मौजे चिखली येथील लोकांनी आडवून धरलेला टिप्पर क्र.एम.एच.-२५-यु-१८९९ हा ४ ब्रास वाळूने भरलेला टिप्पर पोलीस उपनिरीक्षक गजानन अन्सापुरे यांनी तो टिप्पर पोलीस स्टेशनच्या आवारात लावलेला होता. दिनांक ०६/१०/२०२० रोजी सदरचा टिप्पर ०१.५६ मिनिटापूर्वी पोलीस ठाण्याच्या आवारातून चोरी गेला होता. त्यावरुन गजानन अन्सापुरे यांनी स्वत: फिर्यादी होऊन फिर्याद दिली होती. या घटनेचा तपास गोखरे यांच्याकडे होता. त्यांनी तपासाचे दरम्यान दिनांक १३/१०/२०२० रोजी सदरचा टिप्पर किनगाव येथे मिळून आला, याची माहिती मला तपासी अधिकारी गोखरे यांच्याकडून समजली होती. माझे टिपण नोंदविण्यात आले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. भुरकापल्ले</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, टिप्पर चोरीबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रुवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2025.04.29 13:43:43 +0530

**( आर.डी. वाबळे )**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -२९.०४.२०२५